# संत गाडगेबाबा

**माणसात देव शोधणारे संत** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गाडगेबाबांचा **स्मृतिदिन 20 डिसेंबरला** आहे. त्यानिमित्त त्यांची एक गोष्ट आज तुम्हांला सांगणार आहे.

तुम्हांला सर्वांना माहित आहे असेल की गाडगेबाबा जिथेही जायचे तिथे पहिले काय करायचे? **स्वच्छता करायचे.** ही गोष्ट आहे नांदेड जिल्ह्यातील एका गावातली. बारा गावांच्या शिवा म्हणजे बॉर्डर एकत्र आल्या तिथे एक मारुतीचे मंदीर आहे. तेथे गाडगेबाबांचे कीर्तन होते. बाबा आले. त्यांनी साऱ्या मैदानाची साफसफाई केली. बाबांचे कीर्तन झाले आणि **"जेवणाच्या पंगती बसवा"** म्हणून बाबांनी हुकूम सोडला. लोकांची प्रचंड गर्दी होती. जागा मिळेल तिथे लोक रांगेत बसत होते. इतक्यात **एका बाजूला मोठा गोंधळ माजला.** बाबा तिकडे वळले. बाबांना पाहून काही माणसे पटापट बाबांच्या पायावर येऊन कोसळली. बाबांनी विचारले, **"काय झालं? काहून उठले?"**

तेवढ्यात 8-10 माणसे बाबांच्याजवळ आली अन म्हणाली, **"हे आमच्या मांडीला मांडी लावून जेवायला बसतील का?"**
बाबांनी आश्चर्याने विचारले, **"का बा?"**
लोकं म्हणाली, **"हे अस्पृश्य आमच्या पंक्तीत कसे?"**
हे ऐकताच बाबांच्या चेहऱ्यावर राग उसळला. बाबा गरजले, **"तुम्ही याहिले (यांना) जेऊ देणार नाही का?"**
लोकं म्हणाली, **"आमच्याबरोबर तर नाहीच नाही. शेवटी सर्वांचे जेवण झाल्यावर!"**
हे ऐकून बाबांचा राग आणखी वाढला. बाबा रागाने म्हणाले, **"चला हो आमची मंडळी! इथं राह्याचं नाई! काटे का भरत नाही पोटात? इतलं ह्यांनी लाथाडलं, तरी तुम्ही खाली माना घालून यांच्या वाढण्याची वाट पाहत राहता? चला! आमी बी जेवलो नाही कालपासून, उपाशी आहो. तुमीबी जेऊ नका, हे ठिकाण सोडून चला. इथं राह्याचं नाही. आमी आता इथं पाण्याचा थेंबसुद्धा घ्यायचा नाई."**

एका कीर्तनात बाबांनी लोकांना विचारले, **" बामन कोण केले?"** लोकं म्हणाली, **"देवानं केले."** पुढे त्यांनी विचारले, **"महार, मांग, धोबी, चांभार हे कोण केले?"** लोकं पुन्हा म्हणाली, **"देवानं केले."** मग बाबा म्हणाले, **"ह्या सगळ्यांच्या आईच्या पोटातून यायच्या वाटा वेगवेगळ्या आहेत काय?"** लोकं म्हणाली, **"नाही एकच आहे."** त्यावर बाबा म्हणाले, **"मग ही शिवाशिव आली कुठून? ही बनवाबनवी माणसानंच तयार केली."**

**बोला, गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला."**

माणसामाणसात भेद करणे गाडगेबाबांना पसंत नव्हते. सर्व जातीच्या लोकांची एकच जेवणाची पंगत बसवून बाबांनी लोकांच्या मनातील जातीभेद काढून टाकण्याचा प्रयत्न केला. ते म्हणत, **“सर्व जातीतील माणसं ही देवाचीच लेकरे आहेत.”**

**गाडगेबाबांचे हेच समतेचे विचार आपल्याला संविधानात दिसतात. अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा ठरवला. संविधान म्हणतं की सर्व माणसे सारखी आहेत. माणसामाणसात कोणताही भेदभाव नाही.**